# गोपाळ गणेश आगरकरांचे स्त्री सुधारणेचे विचार

**प्रा. वंदना रामचंद्र लोंढे** मालती वसंतदादा पाटीलकन्या महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली

...........................................................................................................................

**प्रस्तावना :**गो. ग. आगरकर यांच्या पूर्वीच महाराष्ट्रात समाजसुधारणेची चळवळ सुरु झाली होती. आगरकर हे प्रखर बुध्दीप्रामाण्यवादी विचारवंत होते. त्यांची स्वातंत्र्यविषयक संकल्पना व्यापक होती. बृध्दिवादी दृष्टीकोणातून समाजजीवनाचे विश्लेषण करुन अन्याय, रुढी, वाईट प्रथा, परंपरा, जातीभेद, स्पृश, अस्पृशता, स्त्रियांवरील अन्याय, अंधश्रध्दा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले केले. गो. ग. आगरकरांच्या विचारांचा महाराष्ट्राच्या सामाजिक, वैचारिक, राजकिय आणि साहित्यिक जीवनावर दुरगामी परिणाम झाला. आगरकरांनी सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून स्त्री प्रश्न सोडविण्याचा जो प्रयत्न केला त्यामध्ये त्यांनी समाजाचा स्त्री विषयक बघण्याचा दृष्टिकोन बदलला. स्त्री सुधारणेची बीजे भारतात १८ व्या शतकात रुजली प्राचीन व मध्ययुगीन काळात स्त्रियांना शिक्षण राजकारण, सामाजिक चळवळी यापासून दूर ठेवले होते. अशा समाजाला स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचे काम आगरकरांनी केले. आगरकरांचे स्त्री सुधारणेचे विचार आजच्या स्थितीत फार महत्वाचे आहेत व प्रस्तूत शोधनिबंधात आगरकरांच्या स्त्री सुधारणेचे विचार या महत्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकण्याचा आणि त्याच्या आजही असलेल्या प्रस्तुततेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) गोपाळ गणेश आगरकर—स्त्री सुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते.** १९ व्या शतकात स्त्रियांना समाजात प्रतिष्ठा नव्हती. जातीभेद, अस्पृशता, सतीची चाल बालविवाह, विधवा विवाह बंदी, केशवपन, शिक्षण बंदी, पडदा पध्दत इ. अनिष्ठ प्रथा समाजामध्ये रुढ होत्या. त्यामुळे समाजाची स्थिती बिघडली होती. स्त्रियांचा विकास कारायचा असेल तर त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे. असे आगरकरांनी वारंवार सांगितले सध्या ज्या प्रकारचे शिक्षण पुरुषांस मिळत आहे त्याच प्रकारचे शिक्षण स्त्रियास मुबलक मिळाले पाहिजे.[१]समाजाच्या उन्नतीसाठी स्त्रियांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे. त्याचबरोबर त्यांना समाजात समान संधी मिळणे गरजेचे आहे. त्यासाठी बालविवाहाची चाल बंद होऊन प्रौढविवाह सुरु होणे आवश्यक आहे. कारण तेरा—चौदा वर्षापासूनच जर मुलींच्यामागे गरोदरपण, बाळंतपण व अपत्य संगोपन इ. कामे लागली, तर त्यांना अभ्यास करणे अशक्य होते. म्हणून उच्च शिक्षण मिळवायचे असेल तर मुलींनी तो पर्यंत अविवाहीत राहिले पाहिजे[२] प्राथमिक शिक्षण मिळाले आहे ती स्त्री अशिक्षित स्त्रीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे अपत्य संगोपन करु शकेल असे आगरकरांना वाटत होते.

**२) स्वंयवर** बालविवाह व त्यापासून होणारे अनर्थ या पासून स्त्रीचे रक्षण करण्यास आपल्या समाजात स्वंयवर पध्दती आणली पाहिजे असे आगरकरांचे मत होते.[३] स्त्री—जीवनात ही सुधारणा झाली तर स्त्रीच्या व्यक्ती मत्वाचा विकास होऊन ती सध्यापेक्षा पुष्कळच जास्त सुखी होईल. असे प्रतिपादन त्यांनी 'प्रिया राधन' स्वयंवर बल्लभोपासना या लेखातून केले आहे. आगरकरांचा मुख्य विचार असा होता की आमच्या देशांत प्राचीन काळी स्वंयवर पध्दती रुढ होती, तेंव्हा ती आज पुन्हा अनुसरण्याला काहीच हरकत नाही. बालविवाहामुळे मुलींच्या शरीरावर परिणाम होत आहे. हे घातक परिणाम विचारी लोकांना दिसत होते. पण रुढी ग्रस्ततेमुळे, कळले तरी वळू नये, अशी स्थितीशीलता समाजाला झालेली होती.[४] यातून बाहेर पडण्यासाठी प्रौढविवाह व स्वंयवर विवाह व्हावेत असे आगरकरांचे मत होते. स्वयंवराचा हा मुद्दा स्पष्ट करताना श्रीकृष्ण—रुक्मिणी, अर्जुन—सुभद्रा, वत्सला—अभिमन्यू, नल—दमयंती यांची उदाहरणे आगरकर देतात, आणि हिंदू समाजाची धुरा वाहणाऱ्यांना सांगतात की, एकीकडे या प्राचीन स्वयंवराचे व ती पध्दत स्वीकारणाऱ्या स्त्री—पुरुषांचे तुम्ही कौतुक करता आणि सध्या ती पध्दत अवलंबली असे म्हणाऱ्यांवर टिका करता, तेंव्हा तुम्ही रुढीचे दास आहात, भेकड आहात, जे सत्य दिसते त्याचा पुरस्कार करण्यास लागणारे मनोधैर्य तुमच्या जवळ नाही. सनातन्यांच्या मते, प्राचीन काळी ती पध्दत योग्य होती, पण सध्या मात्र ती योग्य नाही. त्यावर आगरकर म्हणतात की, असे म्हणण्याचे कारण काय आहे. शकुंतला, मालती, सुभद्रा आणि दुष्यंत, अर्जुन माधव इ. पौरणिक स्त्री—पुरुषांच्या प्रकृतीत आणि आजच्या आमच्या प्रकृतीत जमीन अस्मानाचे अंतर पडले आहे काय? असे मला अजिबात वाटत नाही. तारुण्य, आरोग्य, बृध्दी, संपत्ती, विद्या, स्वरुप जितके त्यांना प्रिय आहे. तितकेच आम्हालाही आहे. तेंव्हा स्वयंवरामुळे ते स्त्री—पुरुष जेवढे सुखी होते तितकेच आजचे ही स्त्री—पुरुष होतील.[५]

**३)वैधव्यबद्दल आगरकरांचे विचार** असंमत वैधव्य, पुनर्विवाह बंदी, बालविवाह, सतीची चाल ही रुढी आगरकरांना अतिशय घातक वाटत होती. यामुळे समाजाची अधोगती होत असे ते म्हणत. भारतीय संस्कृतीत स्त्रिया म्हणजे त्यागमुर्ती, भारतीय स्त्रिया म्हणजे तपस्या, मूक सेवा, भारतीय स्त्रिया म्हणजे अलोट श्रध्दा व अमर आशावाद. निसर्ग ज्याप्रमाणे गाजावाजा न करता काम करीत असतो व फुले फुलवीत असतो त्याप्रमाणे भारतीय स्त्रिया कुटुंबात सतत कष्ट करुन निमूटपणे श्रम करुन आनंद निर्माण करीत असतात.[६] असा भारतीय स्त्रियांचा गौरव साने गुरुजींनी केला आहे. परंतु आज स्त्रीची अवस्था दयनीय झाली आहे. त्याला कारणीभूत समाजातील अनिष्ठ प्रथा आहेत. आगरकरांनी एका विधवेचा विवाह झाल्यावर आपले विचार 'सुधारक' वृत्तपत्रात मांडले. न्यु इंग्लीश स्कूलमधील एक शिक्षक रामचंद्र भिकाजी जोशी यांनी १८९१ च्या मार्च महिन्यात आपल्या आई—वडिलांच्या विरोधाला न जुमानता विधवा

बहिणीचा पुनर्विवाह लावून दिला. तेंव्हा वैधव्य पंकात रुतलेली एक गाय मोकळी झाली, असे म्हणून आपल्या सहकाऱ्यास आगरकरांनी शाबासकी दिली.[७]

**४)स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते आगरकर** गो. ग. आगरकरांनी लहान मुलींच्या शिक्षणाचा विचार केला. आगरकर म्हणतात ''लहान मुलांच्या शिक्षणाची सरकारने जितकी सक्ती केली आहे तितकीच मुलींच्या शिकवण्याबद्दलही केली पाहिजे, कारण मुलांच्या संगोपनाची खरी जबाबदारी आईवरच असते. आई ही मुले स्वावलंबी होईपर्यंत आहोरात्र काळजी घेते. स्वत:ची काळजी न करता मुलांची काळजी करते. अशी काळजी पुरुष करु शकत नाहीत. तेंव्हा ज्या स्त्रीवर अपत्य संगोपनाचे काम आपण सोपवितो त्या स्त्रिला निरक्षर ठेवणे अत्यंत अहितकारक आहे असे आगरकरांना वाटत होते.[८] स्त्री जीवनाची स्थिती सुधारण्यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे स्त्रीशिक्षण हा होय, असे आगरकरांनी सांगितले आहे. मुलांना प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता आहे, पण मुलींना, त्यांच्या मते अशा शिक्षणाची गरज जास्त आहे. कारण अपत्य संगोपनाची जबाबदारी त्यांच्यावर असते. संसार चालविण्याची जाबबदारी त्यांच्यावर असते. संसार चालविण्याची जबाबदारी पुरुषांवर असली तरी मुलाला जन्म देऊन त्याच्या शरीराची व मनाची जोपासना करण्याचे काम स्त्रीच करीत असते.[९]

**५)एकत्र शिक्षण** स्त्रियांना व पुरुषांना एकाच प्रकारचे शिक्षण द्यावे आणि तेहि एकत्र द्यावे, असे हि आगरकरांचे मत होते. [१०] स्त्री पुरुषांना एकाच प्रकारचे शिक्षण द्यावे, एवढेच नव्हे तर ते एकच द्यावे, त्यांत समाजाचे हितच आहे या मताचाही आगरकरांनी पुरस्कार केला आहे.[११] स्त्री व पुरुषांत भेद करु नये. शिक्षण व व्यवसायात दोघांना समान संधी द्यावी. स्त्रियांनी पुरुषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणे करावा, पाहिजे ती विद्या हवी तितकी संपादावी, पाहिजे त्यापरीक्षा द्याव्यात व पदव्या मिळवाव्यात आणि पाहिजे तेंव्हा लग्न करुन संसार करावा असे [१२] आगरकराचे मत होते. योग्य वेळी मुलींना काही उपयुक्त शिक्षण दिले तर ते त्यांना पुढील आयुष्यात चरितार्थासाठी ही निश्चित पणे कामी येईल हा विचारही आगरकरांनी मांडला आहे.[१३] जर स्त्रियांना शिक्षण दिले तर पतीवियोगामुळे, पती निधनामुळे एकाएकी प्राण सोडणारी किंवा आत्महत्या करणारी स्त्री कधीच दृष्टीस पडली नसती.[१५] स्वत:चे पोट भरण्यापुरते शिक्षण तिला मिळालेले असेल तर विधवा स्त्री मानाने जगू शकेल[१६] असे आगरकरांनी प्रतिपादिले आहे.

**समारोप** गोपाळ गणेश आगरकर एक बुध्दिप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक होते. महाविद्यालयीन जीवनातच जॉन स्टुअर्ट मिल आणि हबर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन बुध्दिप्रामाण्यावादी झालेला होता. त्यांनी तत्कालिन समाजातील दोष, अंधश्रध्दा, रुढी–परंपरा, स्त्रीयांचे प्रश्न इ. आपल्या लेखातून मांडले इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' या भूमिकेतून सामाजिक सुधारणांचा पुरस्कार आगरकरांनी केला. स्त्रियांच्या सुधारणेसाठी शिक्षणाची अत्यंत गरज त्यांनी व्यक्त केली. आगरकरांना एकूण ३९ वर्षे आयुष्य लाभले इतक्या अल्प काळात त्यांनी आपल्या प्रभावी विचारांनी समाजाला वळण लावण्याचा प्रयत्न केला. आगरकरांच्या समाजसुधारणेला लोकांकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. पण आगरकरांचे विचार हे त्यावेळीही महत्वाचे होते आणि आजही तितकेच महत्वाचे आहेत.

**संदर्भ**


१. नातू म. गं.,देशपांडे दि.य.संपा. आगरकर–वाङ्मय मुंबई,खंड–१ प्रका.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, प्रथमावृत्ती १९८४, पृष्ठ–२०९

२. प्रधान ग.प्र.आगरकर लेख संग्रह, पृष्ठ–१७७

३. सहस्त्र बुध्दे पु. ग. केसरीची त्रिमूर्ति, पृष्ठ–१७२

४. डॉ. मालशे स. गॅ., मालशे व आपटे नंदा, विधवा विवाह चळवळ,पृष्ठ–६

५. सहस्त्र बुध्दे पु. ग. – उपरोक्त, पृष्ठ १७३

६. साने पा. स. (साने गुरुजी), भारतीय संस्कृती, पुणे प्रका. अ.अ. कुलकर्णी,प्रथमवृत्ती : १९३७, पृष्ठ १३८

७. सुधारक २३ मार्च १९९१

८. प्रधान ग. प्र. – उपरोक्त, पृष्ठ १७७

९. सहस्त्र बुध्दे पु. ग. उपरोक्त पृष्ठ –१७५

१०. उपरोक्त – १७६

११. उपरोक्त–१७७

१२. गोखले पु. पा, आगरकरांशी ओळख, पृष्ठ–२४२

१३. सहस्त्र बुध्दे पु. ग. उपरोक्त, पृष्ठ–१७७

१४. डॉ. मालशे स. ग. उपरोक्त, पृष्ठ–४

१५. सहस्त्र बुध्दे पू.ग. उपरोक्त पुष्ठ – १७६–१७७